तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ८ मे २०२४

आतील पानावर

पान ९– नोराचा अभिषेक बच्चनसोबत फॅमिली...
पान १० – 'अश्वत्थामा'च्या दमदार भूमिकेत अमिताभ
पान १० – 'नो एन्ट्री'मध्ये मानुषी छिल्लर दिसणार?
पान ११ – अल्लू अर्जुनने वाढवली 'फी'
पान ११ – 'देवरा' सिनमात मराठमोळ्या अभिनेत्रीची



# हृतिक रोशन पुन्हा दिसणार 'क्रिश'च्या भूमिकेत

भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात सुपरहिट सुपरहिरो 'क्रिश' पुन्हा पडद्यावर परतणार आहे. या फ्रँचायझीचा 'क्रिश ३' २०१३ साली रिलीज झाला होता. गेल्या ११ वर्षांपासून 'क्रिश ४' बद्दल सातत्याने चर्चा होत आहे. चाहतेही त्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, वॉर, पठाण आणि फाइटर यासारखे चित्रपट बनवणाऱ्या सिद्धार्थ आनंदने हृतिक रोशन पुन्हा एकदा पडद्यावर सुपरहिरोच्या भूमिकेत खळबळ उडवून देणार असल्याची पुष्टी केली आहे. सिद्धार्थ आनंदने या अनिश्चिततेला पूर्णविराम दिला आहे. 'क्रिश ४' वर काम सुरू असल्याचं त्यांनी दुजोरा दिला आहे. हृतिक रोशनसोबत 'फाइटर', 'वॉर' आणि 'बँग बँग'मध्ये काम केलेल्या दिग्दर्शकाने एका पोस्टला उत्तर दिले. यामध्ये एका चाहत्याने विचारले होते की, 'क्रिश' पुन्हा येतोय का? सिद्धार्थने उत्तर दिले, 'हो! तो येत आहे. असं म्हणत खुलासा केला होता. 'क्रिश ४'चे शूटिंग २०२५ मध्ये सुरू होणार आहे.चर्चा सुरु आहे. 'वॉर २' च्या शूटिंगसोबतच हृतिक रोशनने 'क्रिश ४'ची तयारीही सुरू केली आहे. क्रिश ४' चे प्री-प्रॉडक्शनचे काम २०२४ शेवटपर्यंत पूर्ण होईल, तर त्याचे शूटिंग २०२५ मध्ये सुरू होईल. २००३ मध्ये रिलीज झालेल्या 'कोई मिल गया' या चित्रपटापासून 'क्रिश फ्रेंचायझी'ची सुरुवात झाली. यानंतर २००६ मध्ये 'क्रिश' हा चित्रपट प्रदर्शित झाला. यामध्ये हृतिक रोशनसोबत प्रियांका चोप्रा मुख्य भूमिकेत होती.

तर २०१३ मध्ये 'क्रिश ३' रिलीज झाला होता, ज्यामध्ये हृतिक आणि प्रियांकासोबत कंगना रनौत आणि विवेक ओबेरॉय देखील होते.



# इमरान खानचे ९ वर्षानंतर कमबॅक



इमरान खानने 'जाने तू या जाने' या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्याच्या या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. मात्र त्यानंतर त्याला सिनेसृष्टीत फार चांगली कामगिरी करता आली नाही. मात्र इंडस्ट्रीतून ब्रेक घेतल्यानंतर आता ९ वर्षानंतर इमरान खान अभिनयाच्या दुनियेत परतणार आहे. 'हॅप्पी पटेल' असे त्याच्या आगामी चित्रपटाचे नाव आहे. इमरान खानला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहते बर्याच दिवसांपासून वाट पाहत होते. आता इम्रानच्या पुनरागमनाची माहिती मिळताच चाहते देखील आनंदी झाले आहेत. या चित्रपटाची प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहत आहे. इम्रान खानने या चित्रपटाचे गोव्यात शूटिंग सुरू केले आहे. इमरानसोबत या चित्रपटात मुख्य अभिनेत्री कोण असेल हे अद्याप निश्चित झालेले नाही. मात्र मोना सिंग या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा होत आहे. मोनाने यापूर्वीही आमिर खानच्या अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिने लाल सिंग चड्डा, ३ इडियट्समध्ये काम केले आहे. इमरान खानच्या कमबॅक चित्रपटाचे नाव आहे 'हॅप्पी पटेल' आहे. या चित्रपटाची खास गोष्ट म्हणजे आमिर खानचा यात कॅमिओ होणार आहे. हॅप्पी पटेलबद्दल सांगायचे तर, हा एक विनोदी चित्रपट असणार आहे. हा चित्रपट आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊस अंतर्गत बनवला जात आहे. हॅप्पी पटेलनंतर इमरान खान लवकरच वेब सीरिजमध्ये दिसणार आहे. या चित्रपटात तो गुप्तहेराची भूमिका साकारणार आहे. सध्या त्याला पुन्हा एकदा नव्या भूमिकेत पाहण्यासाठी चाहतेही आतुर झाले आहेत.

# नोराचा अभिषेक बच्चनसोबत फॅमिली ड्रामा

नोरा फतेही अभिषेक बच्चनसोबत बी हॅप्पी या चित्रपटात झळकणार आहे. रेमो डिसुझाने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. याबद्दल एका वृत्तसंस्थेशी बोलताना नोरा फतेही म्हणाली, हा खूप चांगला चित्रपट आहे. अभिषेक बच्चनसोबतचा हा एक कौटुंबिक नाटक आहे. हा एक अतिशय साधा आणि गोड चित्रपट आहे. मी याबद्दल उत्सुक आहे. रेमोने त्याचे दिग्दर्शन केले आहे आणि त्याने खूप चांगले काम केले आहे. नोरा फक्त आयटम नंबरपर्यंत मर्यादित राहिली नाहीये. तर या चित्रपटात ती मुख्य अभिनेत्री असेल. 'बी हैप्पी' नंतर पुढील स्टेपसाठी चर्चा होत होती आणि रेमोकडे एक कल्पना होती, यासाठी नोराने लगेच होकार दिला. याआधी नोराने रेमोचा चित्रपट स्ट्रीट डान्सरमध्येदेखील काम केले होते. या चित्रपटातील गाणे 'गर्मी'मधून नोराला खूप लोकप्रियता मिळाली होती. हे गाणे इतके हिट झाले होते की, प्रत्येकजण या गाण्याची हुक स्टेप करताना दिसतो. 'साकी साकी'चे ओरिजनल गाणे कोएना मित्राने केलं होतं. पण हे गाणे ऐकताच समोर येते ती म्हणजे नोर. नोरा फतेहीच्या 'साकी साकी' गाण्याचा डान्स आणि हुक स्टेप खूप व्हायरल आहे. या गाण्यामुळे नोरा फतेही रातोरात इंटरनेट सेन्सेशन बनली. पण, नोराने सांगितले की, या डान्समुळे तिला काय काय सहन करावं लागलं. हे स्टेप्स करताना नोरा फतेहीची स्थिती इतकी बिघडली की, आजदेखील तिला फिजियोथेरेपी घ्यावी लागत आहे.





# मी इंडस्ट्रीत मित्र बनवायला आले नाही

मराठी, बॉलिवूड आणि इतरही भाषांमध्ये अभिनयाचा डंका गाजवणारी सोनाली कुलकर्णी. 'दिल चाहता है' ते रोहित शेट्टीचा 'सिंघम' अशा सिनेमांमध्ये तिने भूमिका साकारल्या आहेत आणि तिचं कौतुकही झालं आहे. सोनाली अनेकदा तिच्या काही वक्तव्यांमुळे चर्चेत येते. इंडस्ट्रीतील लोकांशी मैत्री करण्यावर तिने मोठं विधान केलंय. फिल्म इंडस्ट्रीत कोणत्याच गटात नसण्याविषयी ती काय म्हणाली वाचा. फिल्म इंडस्ट्रीत विशेषत: बॉलिवूडमध्ये अनेक गट विभागले गेले आहेत अशी चर्चा असते. एखाद्या गटात आपली जागा मिळवण्यासाठी कलाकारांना अनेकांशी मैत्री ठेवावी लागते ज्यांच्या ते अजिबातच जवळ नव्हते. मात्र सोनाली कुलकर्णीने याबाबतीत नेहमीच तिचं स्पष्ट मत मांडलं आहे. नुकत्याच एका मुलाखतीत सोनाली म्हणाली, या इंडस्ट्रीत मी कामाने ओळख बनवली आहे. मित्र म्हणून कोणाला मदत करायची झाल्यास मी करेन पण सिनेमात काम देईन इतकं मोठं आश्वासन मी नाही देऊ शकत. तसंच मला सेटवर जाण्याची इच्छा होईल अशा भूमिका मिळाल्या पाहिजेत. जर असं नसेल तर मी माझं १०० टक्के देऊ शकत नाही. मी या इंडस्ट्रीत काम करत आहे कारण मी एकसारखंच काम सतत करु शकत नाही. कोणत्याही प्रोजेक्टच्या शूटिंगपासून ते प्रमोशनपर्यंत जवळपास एक वर्ष निघून जातं. मी त्या प्रोजेक्टमध्येच स्वत:ला जास्त व्यस्त ठेवते. ती पुढे म्हणाली, जोपर्यंत मला स्क्रीप्ट आवडत नाही, तोवर मी प्रोजेक्ट स्वीकारत नाही. अनेकदा मी नकारही दिला आहे. मी या इंडस्ट्रीत मित्र किंवा कुटुंब बनवायला आलेले नाही. सोनाली कुलकर्णी प्रतिभावान अभिनेत्रींपैकी एक आहे. नाटक असो किंवा सिनेमा ती प्रत्येक क्षेत्रात उत्तमोत्तम काम करते. तिच्या अभिनयाची आणि आवाजाची वेगळीच शैली आहे जी प्रेक्षकांच्या पसंतीस पडते.



# 'अश्वत्थामा'च्या दमदार भूमिकेत अमिताभ

अजय 'कल्कि २८९८ एडी' या बहुप्रतिक्षित चित्रपटातून 'अश्वत्थामा'चा पहिला लूक समोर आला आहे. या चित्रपटातील लूक पोस्टर व एक टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे. यामध्ये 'अश्वत्थामा'च्या भूमिकेत महानायक अमिताभ बच्चन यांचा दमदार लूक पाहायला मिळत आहे. या चित्रपटातील लूक पोस्टर बिग बींनी स्वतः शेअर केलं, त्यानंतर टीझर रिलीज करण्यात आला. या वर्षीचा सर्वात मोठा चित्रपट 'कल्कि २८९८ एडी' ची गेल्या काही दिवसांपासून खूप चर्चा होत आहे. एकापाठोपाठ एक कलाकारांचे फर्स्ट लूक समोर येत असून आता या चित्रपटात अमिताभ बच्चन यांचा लूक कसा असेल हेही समोर आले आहे. खुद्द अमिताभ बच्चन यांनी फोटो शेअर केला आहे. या चित्रपटाच्या टीझरमध्ये अमिताभ बच्चन व एका लहान मुलांचे संवाद ऐकू येतात. व्हिडीओत अमिताभ बच्चन यांचे संपूर्ण शरीर पांढऱ्या कपड्याने झाकलेले असून फक्त त्यांचे डोळे दिसतात. ते शिवलिंगाची पूजा करत असताना तेवढ्यात एक मुलगा त्यांच्याकडे येतो आणि म्हणतो, 'हायमी राया आहे.' यानंतर तो अश्वथामाला बरेच प्रश्न विचारतो. मग अश्वत्थामाच्या कपाळातून रक्त येतं आणि मुलगा म्हणतो, 'तू देव आहेस?' यावर ते म्हणतात, 'आता वेळ आली आहे, माझ्या शेवटच्या युद्धाची वेळ आली आहे.' यानंतर ते अश्वत्थामाची ओळख सांगतात. यामध्ये लहान मुलगा तेलुगूमध्ये बोलताना दिसतो, तर अमिताभ बच्चन हिंदीत बोलतात. या टीझरची सध्या जोरदार चर्चा होत आहे. या चित्रपटात प्रभास आणि दीपिका पदुकोण मुख्य भूमिकेत दिसणार आहेत, तर अमिताभ बच्चन यांची खास भूमिका आहे. हा चित्रपट एक मेगाबजेट चित्रपट आहे जो या वर्षी मे महिन्यात प्रदर्शित होणार आहे. नाग अश्विन यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.




# किंग खान शाहरुखसोबत काम करणं हे माझं स्वप्न

एंटरटेनमेंट इंडस्ट्रीतील प्रत्येक कलाकार, मग त्याने ह्या इंडस्ट्रीत आपले नाव प्रस्थापित केले आहे किंवा नाव कमावण्याच्या मार्गावर आहे. महान अभिनेता शाहरुख खान सोबत स्क्रीन शेअर करण्याचे प्रत्येक कलाकाराचे स्वप्न असते. अलीकडेच अभिनेत्री राधिका मदनने त्याच्यासोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. एका लॉन्चिंग सोहळ्यात अभिनेत्री राधिका मदानला विचारण्यात आलेल्या प्रश्नावर उत्तर देताना राधिका म्हणाली, अरे देवा, शाहरुख सरांसोबत काम करणे हे माझ्यासाठी एक स्वप्न पूर्ण झाल्यासारखे होईल. त्यांच्यासोबत एकाच फ्रेममध्ये राहणे माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे.

मी त्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत आहे जेव्हा शाहरुख सर आणि मी एकत्र स्क्रीन शेअर करू. ती म्हणाली, मला असे वाटते की, मला घाबरवणारी एकमेव भूमिका ती आहे जी मी करू शकत नाही. मला माझे पात्र असे हवे आहे की ते मला जागृत ठेवते. जेव्हा मी वेगवेगळ्या कथा घेऊन पडद्यावर येते तेव्हा प्रेक्षकांसाठी एक वेगळी व्यक्तिरेखा असली पाहिजे आणि फक्त एकच पात्र वेग-वेगळे कपडे घातलेले नसावे. कारण एक प्रेक्षक म्हणून मला एकच प्रकारची पात्रं पाहायला आवडणार नाहीत आणि ती करायलाही मला आवडणार नाही.

मला ते पाहण्यात आनंद वाटत नाही. अभिनेता शाहरुख खान प्रमाणेच राधिका मदानने देखील एंटरटेनमेंट इंडस्ट्रीत आपला प्रवास टेलिव्हिजन शोमधून सुरु केला होता. सास, बहू और फ्लेमिंगो आणि साजिनी शिंदे यांच्या व्हायरल व्हिडिओमध्ये ही अभिनेत्री शेवटची दिसली होती.



# ‘नो एन्ट्री’मध्ये मानुषी छिल्लर दिसणार?



**मा**नुषी मानुषी छिल्लर सध्या चर्चेत असलेली अभिनेत्री आहे. कारण एकामागे एक सुपरहिट चित्रपट करत ती प्रेक्षकांची मन जिंकून घेत आहे. ऑपरेशन व्हॅलेंटाइन आणि बडे मियाँ छोटे मियाँ आणि पीरियड-ड्रामा सम्राट पृथ्वीराज यांसारख्या ॲक्शनर्सचा शोध घेतल्यानंतर मानुषी एका कॉमेडी चित्रपटात काम करण्यासाठी सज्ज झाली आहे. सूत्रांनुसार मानुषी छिल्लर, श्रध्दा कपूर आणि कृती सेनॉनसह २००५ मध्ये आलेल्या 'नो एन्ट्री' चित्रपटाचा सिक्वेल असलेल्या 'नो एन्ट्री में एन्ट्री' च्या दिग्गज स्टार कास्टमध्ये सामील होणार आहेत. याची चर्चा सध्या इंडस्ट्रीत जोरदार होताना दिसतात. सूत्रांनी सांगितले की, मानुषी अर्जुन कपूर, वरुण धवन आणि दिलजीत दोसांझ यांच्यासोबत स्क्रीन स्पेस शेअर करणार असून ती मुख्य भूमिकेत या सिक्वलमध्ये सामील होणार आहे. या वर्षाच्या सुरुवातीला जाहीर झालेल्या या प्रोजेक्टमध्ये मानुषी पहिल्यांदा क्रिती आणि श्रध्दा स्क्रीन शेअर करणार आहे. ही अभिनेत्री पहिल्यांदाच अर्जुन, वरुण आणि दिलजीतसोबत अभिनय करताना दिसणार आहे. मानुषी, क्रिती आणि श्रद्धा या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. मानुषी छिल्लर वेगवेगळ्या शैलीतील स्क्रिप्ट्स निवडून एक उत्तम अभिनेत्री आहे हे तिने सिद्ध करून दाखवल आहे.

ती सध्या अली अब्बास जफर दिग्दर्शित ‘बडे मियाँ छोटे मियाँ’ या चित्रपटात दिसत असून तिची भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडली आहे. या ॲक्शनरच्या रिलीजनंतर मानुषी छिल्लर जॉन अब्राहम स्टारर ‘तेहरान’मध्ये दिसणार आहे. दरम्यान, क्रिती तिच्या नुकत्याच रिलीज झालेल्या ‘क्रू’च्या यशाचा आनंद घेत आहे, तर श्रद्धा ‘स्त्री-२’ च्या रिलीजसाठी तयारी करत आहे.



# अजय-तब्बूची जोडी पुन्हा धुमाकूळ घालणार

**अ**भिनेता अजय देवगण आणि तब्बू यांची जोडी सध्या प्रचंड धुमाकूळ घालतेय. दृश्यमपासून तब्बू आणि अजय देवगण हे बॉलिवूडमधले प्रत्येक सिनेमे सुपरहिट करत आहेत. दृश्यम, गोलमाल अगेन, दे दे प्यार दे दे, दृश्यम २, भोला सिनेमात अजय देवगण आणि तब्बू झळकले. भोलानंतर तब्बू आणि अजय देवगण यांचा नवीन सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अजय आणि तब्बू यांच्या 'औरों में कहाँ दम था' या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. अजय देवगण आणि तब्बूच्या जोडीने आतापर्यंत ९ चित्रपटांमध्ये आपली जादू दाखवली आहे. अजय आणि तब्बूचा शेवटचा चित्रपट 'दृश्यम २' होता. २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. ही हिट जोडी आता १० व्या चित्रपटासाठी एकत्र आली आहे. नीरज पांडे दिग्दर्शित 'औरों में कहां दम था' यावर्षी ५ जुलै रोजी प्रदर्शित होणार आहे. स्पेशल २६, बेबी, एम. एस. धोनी द अनटोल्ड स्टोरी,अ वेनस्डे याशिवाय स्पेशल ऑप्स अशा सिनेमा आणि वेबसिरीजचे दिग्दर्शन नीरज पांडेंनी केलंय. रिलायन्स एंटरटेनमेंट निर्मित हा एक रोमँटिक थ्रिलर चित्रपट आहे. अजय देवगण आणि तब्बू हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध ऑन-स्क्रीन जोडपं आहेत. त्यांचा एकत्र पहिला चित्रपट १९९४ मध्ये प्रदर्शित झाला होता. अजय आणि तब्बूने विजयपथ (१९९४ ), हकीकत (१९९५ ), तक्षक (१९९९), दृश्यम (२०१५), फितूर (२०१६), गोलमाल अगेन (२०१७), दे दे प्यार दे (२०१९), दृश्यम २ (२०२२), भोला (२०२३) यामध्ये काम केलं आहे.

# तापसीला तिच्या यशाचा अभिमान

**ता**पसी पन्नूला आज बॉलिवूडमध्ये ओळखीची गरज नाही. चित्रपटसृष्टीला एकामागून एक हिट चित्रपट देणाऱ्या तापसीसाठी हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. अलीकडेच एका मुलाखतीदरम्यान अभिनेत्री तिच्या संघर्षाचे दिवस आठवताना दिसली. त्याचवेळी त्याने बॉलिवूडच्या पापाराझी संस्कृतीवरही खुलेपणाने आपले मत मांडले. तापसी पन्नू शेवटची शाहरुख खानसोबत त्याच्या ‘डंकी’ चित्रपटात दिसली होती. या चित्रपटातील तिची व्यक्तिरेखाही प्रेक्षकांना आवडली.

तापसी बॉलिवूडमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका साकारण्यासाठी प्रसिद्ध आहे. तापसी म्हणते, ‘मी माझ्या करिअरच्या सुरुवातीपासूनच वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका निवडल्या आहेत. तापसी पन्नू तिचे बोलणे चालू ठेवते आणि म्हणते, ‘मी ‘बेबी’ आणि ‘नाम शबाना’ सारख्या चित्रपटांमध्ये ॲक्शन केले आहे. मी ‘सांध की आँख’ आणि ‘मनमर्जियां’ सारखे चित्रपटही केले आहेत. मला वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारण्यात मजा येते. ‘हसीन दिलरुबा’ स्टार तापसी पन्नू म्हणते, ‘मी आज जिथे आहे तिथे पोहोचण्यासाठी मी खूप मेहनत केली आहे. मला असे यश मिळालेले नाही. आता मी जिथे आहे तिथून मी माझ्या करिअरवर तसेच माझ्या वैयक्तिक आयुष्यावर आरामात लक्ष केंद्रित करू शकतो. करिअरसोबतच जीवनात संतुलन राखणेही महत्त्वाचे आहे. तापसी पन्नू सोशल मीडियावर तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खाजगी आहे. तिच्या आयुष्याशी संबंधित गोष्टी सर्वांसोबत शेअर करण्यावर तिचा विश्वास नाही. बॉलीवूडमधील पापाराझी संस्कृतीबद्दल बोलताना ती म्हणते, ‘पापाराझींनी कलाकारांच्या गोपनीयतेचा आदर केला पाहिजे. त्याचे सार्वजनिक जीवनापेक्षा वेगळे जीवन आहे. कधीकधी पापाराझींना ते समजत नाही. तापसी पन्नूच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, २०२३ मध्ये तापसी ‘डिंकी’ चित्रपटात दिसली होती. मीडिया रिपोर्ट्सवर विश्वास ठेवला तर, येत्या काही दिवसांत ही अभिनेत्री ‘वो लड़की है कहाँ’, ‘खेल-खेल में’ आणि ‘फिर आयी हसीन दिलरुबा’ सारख्या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.



# अल्लू अर्जुनने वाढवली 'फी'

प्रेक्षकांचा दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुनचा 'पुष्पा: द राइज' हा चित्रपट सुपरहिट ठरला. या चित्रपटातील त्याच्या गाण्यांनी आणि डायलॉगने प्रेक्षकांना अक्षरश: वेड लावले. या चित्रपटाला मिळालेल्या मोठ्या यशानंतर ता 'पुष्पा २: द रुल या चित्रपटाची घोषणा करण्यात आली.

सध्या या चित्रपटाबाबत विविध अपडेट समोर येत आहेत. यातच आता 'पुष्पा २: द रुल' साठी अल्लू अर्जुन या चित्रपटासाठी मानधन घेणार असल्याची चर्चा असली तरी अशी माहिती समोर येत आहे की, या चित्रपटासाठी सध्या तो मोफत काम करणार असून हा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तो कोट्यावधीची कमाई करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. अल्लू अर्जुनने 'पुष्पा २: द रुल'साठी कोणतेही मानधन घेण्यास नकार दिला असला तरी तो चित्रपटाने केलेल्या एकूण कमाईतून ३३ टक्के हिस्सा घेणार आहे. तर इतर चित्रपटांसाठी 'पुष्पा २' रिलीज होण्यापूर्वीच अभिनेत्याने आपली फी वाढवली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्याने त्याच्या फीमध्ये ३० टक्के वाढ केली आहे. अहवालांवर विश्वास ठेवला तर तो आतापर्यंत १०० कोटी रुपये घेत होता पण फी वाढवल्यानंतर आता तो १५० कोटी रुपये घेत आहे. रश्मिका मंदान्ना 'पुष्पा द रुल'मध्ये पुन्हा एकदा अल्लू अर्जुनसोबत दिसणार आहे. या दोघांच्या लग्नमंडपातून पुष्पा द राइज झाला. याशिवाय फहद फासिल खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. पुष्पा द राइज यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर म्हणजेच १५ ऑगस्टला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.





# इंटिमेट सीन्समुळे अनेक चित्रपट गमावले

अभिनेत्री मृणाल ठाकुरचं करिअर सध्या चांगलंच जोरात आहे. 'सीतारामम' सिनेमाच्या यशानंतर ती अनेक सिनेमांमध्ये दिसली. तिच्या अभिनय आणि सौंदर्याचे प्रेक्षक चाहते झाले. मृणालने 'जर्सी', 'लस्ट स्टोरीज २', 'लव्ह सोनिया' या हिंदी सिनेमांमध्येही काम केलं. सुरुवातीला मृणालला इंटिमेट सीन्समुळे सिनेमांना नकार द्यावा लागला होता. कारण तिच्या आईवडिलांनी तिला पडद्यावर किसींग सीन करण्याची परवानगी दिली नव्हती असा तिने नुकताच खुलासा केला. एका मुलाखतीत मृणाल म्हणाली, सुरुवातीला मी इंटिमेट सीन्स करण्यासाठी अजिबातच कंफर्टेबल नसायचे. मला असे सीन्स करायला घरुनही विरोध होता. मी सरळ सिनेमा नाकारायचे. पण मग मलाच वाटायला लागलं की असं कधीपर्यंत मी सिनेमा सोडणार आहे. मग एके दिवशी मी आईवडिलांजवळ बसले आणि त्यांना म्हणाले की आईबाबा, काही वेळा सिनेमात असे सीन्स द्यावे लागतात. या एका कारणाने मी भूमिका गमावू शकत नाही. ती पुढे म्हणाली, मला कितीही सिनेमा करण्याची इच्छा असली तरी फक्त किसींग सीन्समुळे मला नकार द्यावा लागायचा. एक कलाकार म्हणून तुम्ही कधीही तयार असले पाहिजे कारण कधीकधी हीच सिनेमाची मागणी असते. तुम्ही जर कंफर्टेबल नसाल तर तसं तुम्ही सरळं सांगू शकता पण मी असं न केल्याने अनेक चित्रपट हातचे सोडले. मृणाल ठाकूरचा 'द फॅमिली स्टार' सिनेमा काही दिवसांपूर्वीच रिलीज झाला. यामध्ये विजय देवरकोंडासोबत तिची जोडी होती. तिचे आगामी दाक्षिणात्य आणि बॉलिवूड सिनेमे येणार आहेत. यामध्ये 'पूजा मेरी जान'चाही समावेश आहे. हुमा कुरेशीही सिनेमात झळकणार आहे.




# 'पुष्पा २' या दिवशी होणार रिलीज

साऊथचा सुपरस्टार अल्लू अर्जुन लवकरच त्याचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'पुष्पा २: द रुल' घेऊन येत आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांमध्ये याबद्दल उत्सुकता आहे. नुकतीच पुष्पाची एक झलकही दाखवण्यात आली, त्यानंतर चाहत्यांच्या उत्साहात दुपटीने वाढ झाली आहे. अल्लू अर्जुनच्या वाढदिवसानिमित्त निर्मात्यांनी पुष्पाची झलक दाखवली ज्यामुळे सोशल मीडियावर खळबळ उडाली. दरम्यान, निर्मात्यांनी चित्रपटाचा पहिला एकल रिलीज करण्याची घोषणाही केली आहे. निर्मात्यांनी इंस्टाग्रामवर पुष्पाचे पोस्टर पोस्ट केले आहे.

या पोस्टसह, निर्मात्यांनी घोषित केले आहे की चित्रपटाचा पहिला एकल नुकताच प्रदर्शित झाला आहे. या पोस्टमध्ये अल्लू अर्जुन त्याच्या डॅशिंग स्टाईलमध्ये दिसत आहे. पोस्टच्या कॅप्शनमध्ये असे लिहिले आहे- पुष्पा २: द रुलचा पहिला एकल आज संध्याकाळी ५:०४ वाजता तेलुगू, हिंदी, तमिळ, कन्नड, मल्याळम आणि बंगालीमध्ये रिलीज होईल. निर्मात्यांच्या या घोषणेनंतर लोकांमधील वेड दुपटीने वाढले आहे. सुपरस्टार अल्लू अर्जुनचा त्याच्या ट्रेडमार्क वृत्तीसह मोहक अवतार पोस्टरमध्ये लक्षवेधी आहे. या बातमीसह, निर्मात्यांनी बंगाली भाषेत चित्रपटाच्या रिलीजची पुष्टी देखील केली, ज्यामुळे प्रादेशिक भाषेत प्रदर्शित होणारा हा पहिला संपूर्ण भारतातील चित्रपट बनला. 'पुष्पा २: द रुल' १५ ऑगस्ट २०२४ रोजी जगभरातील थिएटरमध्ये रिलीज होणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुकुमार यांनी केले असून त्याची निर्मिती चूंहीळ चौंळश ने केली आहे. अल्लू अर्जुनसोबत या चित्रपटात रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिकेत आहे. याशिवाय या चित्रपटात फहद फासिल देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. आता प्रेक्षकांना फक्त चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतीक्षा आहे.




# ‘संयुक्त महाराष्ट्र’ चळवळीचा लढा येणार मोठ्या पडद्यावर

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने नुकतीच एका नवीन मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. हा चित्रपट संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर आधारित असेल. या चित्रपटाचं पहिलं पोस्टरदेखील प्रदर्शित करण्यात आलं आहे.

स्वतंत्र भारतात मराठी भाषिकांचे राज्य स्थापन करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळ हा लढा उभारण्यात आला. ही चळवळ भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या आतापर्यंत झालेल्या सर्व चळवळीतील एक प्रमुख चळवळ होती. आजवर झालेल्या अनेक चळवळी या इंग्रजांविरोधातील होत्या. मात्र ही चळवळ वेगळी होती. यामुळे देशाचे राजकारण कोलमडले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. आज याच महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत कल्याणी पिक्चर्स आणि अभिता फिल्म्स प्रस्तुत ‘संयुक्त महाराष्ट्र’ या चित्रपटाची घोषणा केली आहे.

‘पॉवर वर्सेस प्राईड’ अशी टॅगलाईन आहे. सुनील शेळके ‘संयुक्त महाराष्ट्र’ चित्रपटाचे निर्माते आहेत. २०२५ मध्ये हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून यात कोणते कलाकार झळकतील हे येत्या काळात कळेल. चित्रपटाबद्दल निर्माते सुनील शेळके म्हणाले, ही चळवळ आजवरची संयुक्त महाराष्ट्राची सर्वात मोठी चळवळ होती. राजकीय, साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक अशा सगळ्याच बाजुने ही चळवळ होती. चित्रपटात हेच दाखवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

# ‘देवरा’ सिनेमात मराठमोळ्या अभिनेत्रीची वर्णी



साऊथ सुपरस्टार ज्युनिअर एनटीआरचा ‘देवरा पार्ट १’ तेलुगू सिनेमा यावर्षी रिलीज होणार आहे. त्याच्यासोबत जान्हवी कपूर, सैफ अली खान, प्रकाश राज, राम्या क्रिश्नन अशी तगडी स्टारकास्ट आहे. विशेष म्हणजे सिनेमात एका मराठमोळ्या अभिनेत्रीचीही मुख्य भूमिका आहे. ज्युनिअर एनटीआरच्या पत्नीच्या भूमिकेत मराठी अभिनेत्री दिसणार आहे. कोण आहे ती? ‘देवरा पार्ट १’ या तेलुगू सिनेमातून मराठी अभिनेत्री ज्युनिअर एनटीआरसोबत झळकणार आहे. ही अभिनेत्री आहे श्रुती मराठे. श्रुती मराठेने याआधी तमिळ सिनेमांमध्ये काम केलं आहे. आता तिला हा महत्वाचा प्रोजेक्ट मिळाला आहे. श्रुतीची ज्युनिअर एनटीआरच्या सिनेमात तेही त्याच्या पत्नीच्या भूमिकेत कशी वर्णी लागली याविषयी सांगताना ती म्हणाली, दोन वर्षांपूर्वी गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीतले ढोल वादनाचे फोटो मी पोस्ट केले होते. ते बर्यापैकी व्हायरल झाले. मी जेव्हा देवराच्या दिग्दर्शक आणि निर्मात्यांना भेटले तेव्हा त्यांनी माझ्या या फोटोंचं कौतुक केलं. त्यांना आपल्या विसर्जन मिरवणूक आणि ढोल पथकाचं खूप कुतुहल वाटत होतं. अगदी ज्युनिअर एनटीआरलाही माझे फोटो आवडले. ती पुढे म्हणाली, हा माझा पहिलाच तेलुगू सिनेमा आहे. त्यामुळे धाकधुक होतीच. भाषेचीही अडचण होती. पण मला टीमने सांभाळून घेतलं. ते मला देवनागरीमध्ये लिहून द्यायचे. मी ते पाठ करुन शूट करायचे.

माझे जास्त सीन्स हे ज्युनिअर एनटीआरसोबत आहेत. शूटिंगच्या पहिल्या दिवशी मी खूप नर्व्हस होते. पण त्यांनी मला सांभाळून घेतलं. ढोलवादनाच्या फोटोंमुळे श्रुतीला ही भूमिका ऑफर झाली. त्यामुळे महाराष्ट्रीयन असल्याचा तिला सार्थ अभिमान वाटतो असंही ती म्हणाली. श्रुती मराठेचा 'अलीबाबा आणि चाळीशीतले चोर' हा सिनेमा काही दिवसांपूर्वीच रिलीज झाला. हा सिनेमा प्रेक्षकांचा भलताच पसंतीस पडला आहे. शिवाय ती नवऱ्यासोबत मिळून मालिकांची निर्मितीही करते.

# अमृता घेतेय आता ‘या’ शास्त्रीय नृत्यप्रकाराचं शिक्षण



उत्तम अभिनयासोबतच तितक्याच उत्तम नृत्यासाठी अभिनेत्री अमृता खानविलकर ओळखली जाते. तिची अदाकारी, तिचे हावभाव याचे अनेकजण फॅन आहेत. आजवर अनेक अफलातून भूमिका साकारून त्या अजरामर केल्या आहेत. 'वाजले कि बारा','चंद्रा', 'बाई गं' ही तिची काही गाजलेली गाणी म्हणता येतील. तिचं नृत्यावरचं प्रेम तिचे चाहते चांगलंच जाणून आहेत. अमृता तिच्या आगामी मराठी सिनेमांसोबतच बॉलिवूड प्रोजेक्टच्या तयारीमध्येही व्यस्त आहे. यासोबतच अमृता तिचं लहानपणीच स्वप्न पूर्ण करतेय. अमृता शास्त्रीय नृत्य शिकतेय. अमृता कथ्थक हा शास्त्रीय नृत्यप्रकार शिकत असून ती या नवीन कामगिरीसाठी खूप खुश आहे. अमृताचं नृत्यप्रेम हा तिच्या जिव्हाळ्याच्या विषय आहे आणि म्हणून तिने कथ्थक शिकण्याचा निर्णय घेतला आहे. अमृता नुकतीच हिरामंडीसाठी दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांच्यासोबत दिसली होती. आता हे दोघं भविष्यात बरोबर काम करणार का? हा प्रश्न देखील तिच्या चाहत्यांना पडला आहे. या बद्दल बोलताना अमृता म्हणते लहानपणी सगळ्यांची स्वप्न असतात आपण मोठं होऊन हे करावं ही आवड जोपासावी तसचं माझं एक लहानपणीच स्वप्न होत आपण कथ्थक शिकावं. नृत्य म्हणजे माझ्यासाठी जीव की प्राण असा विषय होता पण लहानपणी तेवढी परिस्थिती नसल्यामुळे मला कथ्थकच प्रशिक्षण घेता आल नाही म्हणून ही इच्छा मी आता पूर्ण करतेय आणि त्याचा खूप जास्त आनंद आहे. मंजिरी देव यांची नातसून प्रिया यांच्याकडून मी कथ्थकच प्रशिक्षण घेतेय. याआधीही अमृताने तिच्या इंस्टाग्राम आणि युट्युब चॅनेलवर अमृतकला या नावाने उपक्रम सुरु केला होता. या उपक्रमात ती विविध गाण्यांवर नृत्य सादर करायची. तिचे हे डान्स रील चांगलेच व्हायरल झाले होते. येत्या काळात अमृता अनेक वेगवेगळ्या प्रोजेक्ट्स मधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. . 'कलावती','ललिता बाबर','पठ्ठे बापूराव' हे मराठी सिनेमे तिच्या प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. यासोबतच ती काही बॉलिवूड प्रोजेक्ट्स् मध्येही काम करणार असल्याची चर्चा आहे.

स्मरण

ॲड. सुनील पाळधीकर
भ्र. ९८२२६९२८४९

# नौशाद अली



## चित्रपट संगीताच्या सुवर्ण काळाचे शिल्पकार

१९४६चा काळ असावा नौशादजी 'चांदनी रात' साठी संगीत तयार करीत होते. महत्त्वाचा फोन करण्याच्या निमित्ताने ते रेकॉर्डिंग रूमच्या बाहेर असलेल्या टेलिफोन बुथवर आले. त्यांचं लक्ष एका मंजुळ आवाजाने आकर्षून घेतलं. एक तरुणी बाजूने जाताजाता गाणं गुणगुणत होती. फोन करण्याच्या व्यस्ततेत ती मुलगी कोण आहे हे काही ते पाहू शकले नव्हते. आवाजावरून ती महाराष्ट्रीयन असावी असं त्यांना वाटून गेलं. त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना कळलं की, आज कोरसमध्ये गाण्यासाठी काही मुली आल्या होत्या. त्यांनी आपल्या सहाय्यकाला त्या कन्येला शोधून आणण्यास सांगितले. सहायकला ही प्रश्न पडला की नूरजहाँ, राजकुमारी, सुरैया आणि शमशादसारख्या ख्यातनाम गायिका उपलब्ध असताना नौशादजी 'त्या' मुलीला का शोधतायेत. नौशादजींना त्या मुलीच्या आवाजात काहीतरी वेगळेपण जाणवलं होतं. त्यांना हिरा गवसला होता. थोडे पैलू पडण्याची गरज होती. त्या मुलीला शोधण्यात सहाय्यकाला यश मिळालं.

दुसर्‍या दिवशी भर पावसात एक मुलगी छत्री घेऊन ओली होत आली होती. सडपातळ, सावळीशी, सर्वसाधारण उंचीची आणि कंबरेच्याही खाली दोन वेण्या रुळत असलेली एक कन्या नौशादजी समोर उभी होती. नौशादजींनी तिला नाव विचारताच तिच्या तोंडून शब्द पडले. 'लता मंगेशकर'. त्यांचा दुसरा प्रश्न होता इतक्यात एखादं सोलो गाणं गायलं का? उत्तर हो! गुलाम हैदर साहेबांनी मजबूर चित्रपटासाठी एक गाणं माझ्याकडून गाऊन घेतले आहे. लताजींनी एक दोन गाणी गाऊन दाखविली आणि नौशादजी इतके खूष झाले की, चांदनी रातचं एक गाणं लताला गायला मिळालं. पुढे अंदाजसाठी लता मंगेशकर गायिल्यात. अंदाजमध्ये राज कपूर आणि दिलीप कुमार होते. एका गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या वेळी नौशादजींनी आग्रहाने राज कपूर आणि दिलीप कुमार दोघांनाही आमंत्रित केलं. एक नवीन आवाज ऐकण्यास बोलावलं होतं. दोघांनाही नवीन आवाज ऐकण्यात रस नव्हता. केवळ नौशादच्या आग्रहाखातर दोघे उपस्थित झाले होते. रेकॉर्डिंग सुरू झालं आणि दोघांच्याही चेहर्‍यावरचे भाव बदलत गेले. राज कपूर तर त्या स्वर्गीय आवाजाच्या प्रेमातच पडले.

लता- रफी- मुकेश युगाची सुरवात झाली होती. सोबत मन्नादा आणि तलत होते. १९४९ मध्ये अंदाज बरोबर दुलारी देखील प्रदर्शित झाला. मो. रफी दुलारीपासून प्रकर्षाने लोकप्रिय झाले. सुहानी रात ढल चुकी, ना जाने तुम कब आओगी हे गाणं तर मो.रफी ह्यांचंही आवडतं गाणं आहे. १९५२ पर्यंत नौशादसाहेबांनी दिल्लगी, बाबूल, दस्तान, दीदार, जादू, आन आणि दिवाना इत्यादी चित्रपट केलेत. सांगीतिकदृष्ट्या सर्वच चित्रपट सरस होते. १९५२ मैलाचा दगड ठरला तो 'बैजू बावरा'. चित्रपट संगीत सम्राट तानसेन आणि बैजनाथ ह्यांच्याशी निगडित असल्यामुळे अभिजात संगीत हा चित्रपटाचा गाभा होता. चित्रपटातील तानसेन जुन्या काळातले नट सुरेंद्र ह्यांनी उभा केला तर बैजनाथच्या भूमिकेत भारत भूषण होते आणि सोबत मीना कुमारी. बैजुबावराच्या गाण्यांनी चित्रपटसृष्टी गाजवून सोडली. गाण्यांसाठी उस्ताद अमीर खानसाहेब आणि पं पलुस्कर ह्यांची योजना झाली. चित्रपटाची सर्व गाणी संगीत प्रेमींसाठी सुंदर मेजवानी ठरली. ह्यातील सर्वच गाणी रागदारीवर आधारित होती. 'आज गावत मन मेरो झुमके' ही देसी रागातली पं. अमीर खान आणि पं. पलुस्कर ह्यांची जुगलबंदी ऐकण्यासारखी आहे. कामं मिळायला सुरवात झाल्यानंतर नौशादसाहेब कुलाब्यावरून दादरला शिफ्ट झाले होते. एका खोलीत राहत होते आणि शेजारीच असलेल्या खानावळीत जेवायला जायचे. तिथे जेवायला येणार्‍या लोकांचा चांगला ग्रुप जमला. त्या मित्रांमध्ये एक शिंपी होता. त्याचं शेजारीच दुकान होतं. तो खूप बढाया मारत असे. आजकाल काय लोकं चित्रपट तयार करतात, मी जेव्हा सिनेमा करील तेंव्हा लोकं तोंडात बोटं घालतील. आणि झालंही तसंच, एक दिवस नोटांचं बंडल घेऊन तो नौशादकडे आला आणि म्हणाला मी चित्रपट करतो आहे, तुला संगीत द्यायचं आहे आणि हा राहिला ॲडव्हान्स. हा शिंपी दुसरा तिसरा कोणी नसून महान दिग्दर्शक झालेला के. आसिफ होता. प्रस्तावित चित्रपट होता मुगल ए आझम. तसं पाहिलं तर नौशादजी आणि सी रामचंद्र खूप चांगले समवयीन मित्र. मुगल ए आझमच्या तुलनेत 'अनारकली' लवकर तयार झाला. मुगल ए आझमला मात्र ६-७ वर्षे लागलीत. मुगल ए आझमची गोष्टच वेगळी होती. के. आसिफ ह्यांना मुगल ए आझमच्या गाण्यासाठी बडे गुलाम अली खान हवे होते पण खानसाहेब चित्रपटासाठी गात नसत. के. आसिफ अडून बसले. खानसाहेब हलक्या आवाजात नौशादला म्हणाले की, या माणसाला एवढी रक्कम सांगतो की, हा पळून जाईल. त्यांनी एका गाण्याचा मेहनताना पंचविस हजार रुपये सांगितला. के.असिफ पळून जाणार्‍या पैकी नव्हताच उलट त्यांनी खान साहेबांना म्हटलं तुमची किंमत ह्या पेक्षा कितीतरी जास्त आहे. एका गाण्यासाठी विनंती केली पण रग्गड पन्नास हजार रुपये मोजून बडे गुलाम अली खान साहेबांकडून दोन गाणी गाऊन घेतली एक होतं. 'शुभ दिन आयो' आणि दुसरं 'प्रेम जोगन बन के' या शिवाय लताची पण सुंदर गाणी होती.

मुगल ए आझमच्या गीत संगीतात न्हाऊन निघत असतांनाच त्याच वर्षी 'कोहिनूर' नावाचा एक चित्रपट प्रदर्शित झाला. कोहिनूर लक्षात राहिला तो रफी साहेबांनी गायिलेल्या हमीर रागातील अजरामर गीतामुळे ज्याचे बोल होते. मधूबन मे राधिका नाचे रे... आजही ह्या गाण्याची भुरळ कायम आहे. या शिवाय दो सितारोंका जमीं पर है मिलन आज की रात रफी- लता, कोई प्यार की देखें जादूगरी रफी- लता त्याच प्रमाणे चलेंगे तीर जब दिलपर ही गाणी श्रवणीय होती. नौशादजींच्या अधिकतर चित्रपटात दिलीप कुमारची भूमिका राहत असे. १९६१ मध्ये स्वतः दिलीप कुमारने एक चित्रपट निर्माण केला त्याच नाव होतं. गंगा जमुना ह्या चित्रपटात भोजपुरी भाषेचा उपयोग करण्यात आला होता. त्यामुळे गाण्यासाठी सुद्धा भोजपुरी भाषेतले शब्द वापरण्यात आले. १९६४ मध्ये परत तीच संगीताची जादू कायम राहिली. चीन युद्धानंतर झालेल्या कार्यक्रमासाठी नौशादजींनी एक रचना केली होती. शब्द होते, अपनी आझादी को हम हरगीज मिटा सकते नही लीडर मध्ये आधी हे गाणं नव्हतं पण तशी सिच्युएशन तयार करून हे गाणं टाकल्या गेलं. लीडरमध्ये ललित रागावर आधारित सुंदर गाणं होतं शब्द होते. एक शहेनशहा ने बनवा के हंसी ताज महल अजूनही काही चांगली गाणी होती, त्यात तेरे हुस्न की क्या तारीफ करू, हमी से मुहोब्बत हमी से लढाई, आज है प्यार का फैसला ऐ सनम लीडरनंतर नौशादजींनी दिल दिया दर्द लिया केला. त्याचं यमन रागातील शिर्षक गीततर छानच होतं, पण कोई सागर दिल को बहलाता नही, सावन आये या न आये ही गाणीही रसिकांनी डोक्यावर घेतली.

१९६७ ते ७० मध्ये राम और शाम, आदमी, साथी, संघर्ष आणि गँवार असे चित्रपट त्यांच्या नावावर आहेत. या चित्रपटांची आजकी रात मेरे, आज पुरानी राहोसे, मेरा प्यार भी तू है, मेरे पैरोमे घुंगरु बंधा दे अशी सर्वच गाणी छान होती. मला एका प्रश्नाचं नेहमीच कोडं वाटतं. राजेंद्र कुमारचा आग्रह नेहमीच मो. रफी ह्यांचे साठी असायचा पण नौशाद ह्यांनी साथीसाठी मुकेशचा वापर कसा काय केला असेल? असो, आपण चित्रपट संगीताच्या सुवर्ण काळाचाच विचार करीत असल्यामुळे नौशादजींचा पुढचा प्रवास लिहिणार नाही. बाकी प्रवासाबद्दल लिहायचंच झालं तर लखनौपासून मुंबईपर्यंतचा प्रवास, दादरच्या लहानशा खोलीपासून तर बांद्राच्या आलिशान 'आशियाना' बंगल्यापर्यंतचा प्रवास आणि १९४० सालच्या पहिला चित्रपट प्रेमनगर पासून तर २००५ च्या ताजमहल मालिकेपर्यंतचा प्रवास आणि हो अजून एक जी. एम. दुर्रानी, सुरेंद्रपासून तर हरिहरनपर्यंतचा प्रवास रोचक असाच होता. नौशाद यांच्यासारखा एक संयमी, निर्व्यसनी आणि शास्त्रीय संगीताचा उत्तम जाणकार पुन्हा झाला नाही आणि होणार नाही.

(लेखक चित्रपट आणि संगीताचे अभ्यासक आहेत.)

# 'हरी हर वीरमल्लू' मध्ये बॉबी दिसणार खास भूमिकेत



साऊथचा सुपरस्टार पवन कल्याणचा आगामी चित्रपट 'हरी हर वीरा मल्लू'चा टीझर रिलीज झाला आहे. निर्मात्यांनी या चित्रपटाच्या पहिल्या भागाचे नाव 'स्वॉर्ड व्हर्सेस स्पिरिट' असे ठेवले आहे. चित्रपटाचे चित्रीकरण मोठ्या बजेटमध्ये करण्यात आले आहे. या चित्रपटात बॉबी देओल दिल्लीच्या सुलतानच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाच्या टीझरमध्ये पवन कल्याणची व्यक्तिरेखा योद्धा म्हणून दाखवण्यात आली आहे. या चित्रपटात तो गरीब शोषितांच्या न्यायासाठी मुघलांशी लढताना दिसणार आहे. यासोबतच तो चित्रपटात मुघलांकडून कोहिनूर हिरा चोरण्याचा प्रयत्न करताना दिसणार आहे. ट्रेलरची सर्वात खास झलक बॉबी देओलच्या व्यक्तिरेखेची होती. हा अभिनेता क्रूर मुघल शासक औरंगजेबाच्या भूमिकेत दिसणार आहे. पवन कल्याण आणि बॉबी देओल या दोन्ही स्टार्सचा अभिनय दमदार दिसत आहे. त्याच्या या लुकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 'हरि हर वीर मल्लू' या चित्रपटाचं दिग्दर्शन दिग्दर्शक क्रिश जगरलामुडी यांनी केले आहे. सुमारे दोन कोटींच्या बजेटमध्ये बनलेला हा चित्रपट या वर्षाच्या अखेरीस प्रदर्शित होणार आहे. पवन आणि बॉबी व्यतिरिक्त निधी अग्रवाल, नोरा फतेही, विक्रमजीत विर्क आणि नर्गिस फाखरी हे कलाकार या चित्रपटात दिसणार आहेत. चित्रपटाचे संगीत'आरआरआर' फेम एमएम किरवाणी यांनी दिले आहे. दरम्यान, गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'निमल'च्या यशानंतर बॉबी देओल पुन्हा एकदा खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. 'हरी हर वीरा मल्लू' व्यतिरिक्त तो 'कांगुवा' चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटात साऊथचा सुपरस्टार सूर्या मुख्य भूमिकेत असणार आहे.



# 'रामायण'मध्ये लारा साकारणार महत्त्वपूर्ण भूमिका?

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर लवकरच रामायण या आगामी सिनेमात झळकणार आहे. या सिनेमातील भूमिकांवरील पडदा दूर सारला जात आहे. यामध्येच आता या सिनेमात अभिनेत्री लारा दत्ता कैकयीची भूमिका साकारणार असल्याचं म्हटलं जात आहे. अलिकडेच लाराने एका मुलाखतीमध्ये तिने सिनेमाविषयी खुलासा केला. सध्या सोशल मीडियावर रामायण या सिनेमाविषयी अनेक चर्चा रंगत आहेत. यामधयेच या सिनेमात लारा दत्ता सुद्धा महत्त्वपूर्ण भूमिका साकारणार असल्याचं म्हटलं जात आहे. परंतु, या चर्चांना लाराने पूर्णविराम दिला आहे. लाराने या सिनेमाविषयी मोठा खुलासा केला आहे. या सिनेमात माझी भूमिका आहे असं माझ्याही कानावर आलं आहे. पण मी एक क्लिअर करते. मला माझ्याविषयी पसरणाऱ्या अफवा ऐकायला आवडतात. ज्या अफवा पसतायेत त्या पसरू देत रामायणचा भाग असावं असं कोणाला वाटणार नाही? या सिनेमात बरीच पात्र आहेत. त्यामुळे जर मला एका भूमिकेची जरी ऑफर मिळाली तरी मी आवडीने ती साकारेन. शूर्पणखा, मंदोदरी कोणतीही भूमिका करायला मी तयार आहे, असं लारा म्हणाली. दरम्यान, लारा अलिकडेच 'रणनिती:बालकोट अँड बियॉन्ड' या सीरिजमध्ये झळकली आहे. या सीरिजमध्ये तिच्यासोबत जिमी शेरगील, प्रसन्ना, आशुतोष राणा, आशिष विद्यार्थी हे कलाकार झळकले आहेत.

# पहिल्यांदाच नकारात्मक भूमिकेत दिसणार रणवीर



२०२४ हे वर्ष रणवीर सिंगसाठी खूप चांगले ठरत आहे. तो सातत्याने अनेक चित्रपट साइन करत आहे. या अभिनेत्याकडे आधीच दिग्दर्शक फरहान अख्तरचा बहुप्रतिक्षित 'डॉन ३' चित्रपट आहे. याशिवाय रणवीरकडे दिग्दर्शक शेट्टीचा कॉप युनिव्हर्सचा मेगा बजेट चित्रपट 'सिंघम अगेन' देखील आहे. आता रणवीर सिंगने आणखी एक चित्रपट साईन केला आहे. रणवीर आता दिग्दर्शक प्रशांत वर्मा यांच्या 'राक्षस' या चित्रपटात दिसणार आहे. रणवीर त्याच्या चित्रपटांच्या अपडेट्समुळे सतत चर्चेत असतो. रणवीरने गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'हनुमान' चित्रपटाचे दिग्दर्शक प्रशांत वर्मा यांच्याशी हातमिळवणी केली आहे. त्यांचा हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला होता.'राक्षस' चित्रपटाबाबत प्रशांत आणि रणवीर सतत भेटत होते. भेटीदरम्यान प्रशांतने रणवीरला चित्रपटाची कथा सांगितली आणि त्याला ती खूप आवडली. रणवीरने प्रशांतसोबत डील फायनल केली आहे. सध्या या चित्रपटाचे नाव 'राक्षस' असे ठेवण्यात आले आहे. 'राक्षस' चित्रपटात रणवीरशिवाय इतर कोणत्याही स्टारला अप्रोच करण्यात आलेले नाही. हा चित्रपट कधी प्रदर्शित होणार यावर सध्या तरी पडदा पडला नाही. 'राक्षस' हा स्वातंत्र्यपूर्व काळातील पौराणिक पार्श्वभूमीवर आधारित पिरियड फिल्म असल्याचे म्हटले जाते. चित्रपटातील रणवीरचे पात्र नकारात्मक असू शकते. रणबीर शेवटचा 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटात दिसला होता. या चित्रपटातील त्याची आलिया भट्टसोबतची जोडी चाहत्यांना खूप आवडली होती. या चित्रपटाशिवाय रणवीर दिग्दर्शक आदित्य धर यांच्या अनामित चित्रपटातही दिसणार आहे.

# अनुष्का शर्माला बनायचे होते पत्रकार



बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्माला आज कोणत्याही ओळखीची गरज नाही. पण तुम्हाला माहित आहे का की, बॉलिवूडच्या टॉप अभिनेत्रींपैकी एक असलेल्या अनुष्काची पहिली पसंती अभिनेत्री बनणे नाही तर पत्रकार बनणे होती. होय अनुष्का शर्माला एकेकाळी पत्रकारितेत तिचं करिअर करायचं होतं, पण तिच्या नशिबाने तिला आधी मॉडेलिंग आणि नंतर अभिनयाच्या दुनियेत खेचलं. चला, अनुष्का शर्माच्या वाढदिवसानिमित्त जाणून घेऊया... तिच्याबद्दलच्या काही गोष्टी. अनुष्का शर्माने शाहरुख खानच्या 'रब ने बना दी जोडी' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटातील अनुष्का शर्माचा निरागसपणा आणि तिची व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आवडली. 'रब ने बना दी जोडी' नंतर अनुष्काचे नशीब बदलले आणि अभिनेत्रीला चित्रपटांची ओढ लागली. शाहरुख खाननंतर अनुष्का शर्माने शाहिद कपूरच्या बदमाश कंपनी या चित्रपटात आपली ताकद दाखवली. शाहिद कपूरनंतर अनुष्काने रणवीर सिंगसोबत बँड बाजा बारातमध्ये वेडिंग प्लॅनरची भूमिका साकारून बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. अनेक चित्रपट केल्यानंतर अनुष्का शर्मा पुन्हा एकदा शाहरुख खानसोबत जब तक है जानमध्ये दिसली. यशाची शिडी चढल्यानंतर अनुष्का शर्माने पीकेमध्ये आमिर खानसोबत काम केले. अनेक चित्रपटांमध्ये तिचा दमदार अभिनय दाखवल्यानंतर, अनुष्का शर्माने स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस उघडले, जे नंतर अभिनेत्रीने तिच्या भावाला दिले. अनुष्का शर्माने तिच्या फिल्मी करिअरमध्ये एनएच१०, दिल धडकने दो, सुलतान, ए दिल है मुश्किल आणि परी यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये ताकद दाखवली आहे. अनुष्का शर्माच्या वैयक्तिक आघाडीबद्दल बोलायचे तर, अभिनेत्रीने २०१७ मध्ये भारतीय क्रिकेटर विराट कोहलीसोबत लग्न केले. आज अनुष्का आणि विराट कोहलीला दोन मुले आहेत. मुलगी वामिका आणि मुलगा अकाय. अनुष्का शर्मा सध्या तिच्या मातृत्वाचा आनंद घेत आहे.